Vol 6 Issue 9 October 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# ग्रामराज्य आणि ग्रामसभा
# म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दृष्टीकोण

प्रा.डॉ.भगवान माने
राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.



**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून खेडे गांव किंवा गाव या घटकाचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेशी संबध जोडला जातो. प्राचीन वेदवाङ्मयात गावातील मानव आणि प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी प्रार्थना केल्या जात होत्या वैदिक ग्रामसभेच्या प्रमुखस्थानी ग्रामणी असल्याचा उल्लेख कौटील्याचा अर्थशास्त्र ग्रंथात सापडतो. बुध्दकाळ ते गुप्तकाळापर्यंत गणराज्याचा कारभार स्थानिक सभासदांच्या मदतीने केला जात असे. गुप्तकाळात नगर असे. नगरप्रशासनाचे दोन भाग होते. मोठया नगराचा कारभार पाहणा—यास नगराध्यक्ष आणि ग्रामाचा कारभार पाहण्या—यास ग्रामाध्यक्ष असे संबोधले जात असे गावाचा कारभार गावकरी पाहतात. अनुभवी वृध्दाकडून घेतलेल्या निर्णयांचे पालन गावक—याकडून केले जाते. असे प्रवास वर्णन मॅगेस्थेनिस या ग्रीक प्रवाशाने केलेले आहे. गावातील साफसफाई आरोग्य यात्रा बाजार इत्यादीची व्यवस्था ग्रामसभा करते असे गावाबद्दल वर्णन केले आहे. ग्रामपंचायतीचे विकसित स्वरूप इ.स.पूर्वी सहाव्या शतकात आढळते. तत्कालीन उत्तर भारतातील शाक्य,विदेह, मालव लिच्छवी या लोकसत्ताक राज्याचा कारभार प्रजेच्या सभेद्वारे केला जात असे. परंतु प्राचीन भारतातील ग्रामव्यवस्थेच्या कार्यपध्दतीबाबत निराश व्हावे लागते. कारण तत्कालीन ग्रामव्यवस्थेमध्ये लोकशाही मूल्यांचा अभाव होता.

खेडयांच्या विकास म्हणजे देशाचा विकास असे खेडयाबाबत म्हटले आहे. महात्मा गांधीजींनी खेडयाविषयी पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केले आहेत.

'' भारत हा खेडयांचा देश आहे. स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर खेडी हे आपले राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे आणि खेडे हा शासनाचा प्राथमिक घटक आहे'' परंतु महात्मा गांधीजींच्या खेडयाच्या कल्पनेपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खेडयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. त्यांनी खेडे या घटकाविषयी पुढीलप्रमाणे मत मांडले आहे.

भारतातील ग्रामीण संस्कृती ही भारताच्या विनाशाचे कारण आहे. सर्व प्रकारचे अज्ञान आणि संकुचित मनोवृत्ती यांचे आगर म्हणजे भारतातील खेडी होत.''

महात्मा गांधीजींची खेडे किंवा गावासंबंधीची कल्पना रामराज्याची होती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टीकोन लोकशाही मूल्यांची जोपासना करणारा आहे. लोकशाही विकेंद्रकरणाचा उद्देश स्थानिक पातळीवर सत्तेचे वाटप करण्याचा आहे. इंग्रजांची भारतात स्थनिक स्वराज्य संस्थांची निर्मिती आर्थिक किंवा महसूल या घटकावर आधारीत होती. स्वातंत्र्यानंतर खेडयाकडे राजकीय घटक या दृष्टीनेच फक्त पाहिले गेले. सामाजिक घटक म्हणून खेडयाचा विचार केला गेला नाही. म्हणून प्राचीन काळापासून आजपर्यंत खेडे हा वादाचा विषय ठरलेला आहे.

स्वातंत्र्यापूर्व काळातही खेडे किंवा गावाची चर्चा होऊन सहा दशकाहून अधिक काळ लोटल्यानंतर 73 व्या संविधाना दुरूस्तीनंतर खेडे या घटकाला कायदेशीर हक्काचा दर्जा देण्यात आला. भारतीय संविधानातील' राज्याच्या मार्गदर्शक तत्वाच्या कलम 40 मध्ये राज्य हे ग्राम—पंचायतीची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी कार्यप्रवण होईल व त्यांना स्वराज्याचे मूलघटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यास आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधिकार बहाल करेल. अशी तरतूद कशा प्रकारे झाली यासंबंधी खेडे या घटकांची संविधान सभेतील चर्चा किंवा व्युक्तिवादाला महत्व आहे.

**संविधान सभेतील चर्चा :**

संविधान सभेत ग्रामपंचायती स्थापण्याच्या चर्चेमध्ये अनेक

सदस्यांनी सूचना उपसूचना मांडल्या होत्या. ऑगस्ट 1947 च्या चौथ्या सत्रात गांधीवादी सदस्य रामनारायण सिंग यांनी ग्रामपंचायतीतील अधिकार देण्यासंबंधी पुढीलप्रमाणे सूचना केली होती.

'' प्राथमिक घटक म्हणून खेडेगावात ग्रामपंचायती स्थापन करून त्यांना सत्तेचे वाटप करण्यात यावे''

भारतात जाती– व्यवस्थेची पाळेमुळे भक्कम रोवली आहेत. व्यक्ती–व्यक्तीमध्ये विषमता आहे. म्हणून देशातील जनतेला प्रथम हक्कांची हमी मिळाली पाहिजे. ग्रामचंचायतीला स्थानिक पातळीवर इतर अधिकाराबरोबर न्याय–निवाडयाचा अधिकार देणे कसे अयोग्य आहे. यासंबंधी बेगम ऐजाझ रसूल यांनी सभागृहात पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केले होते.

'' दोनशे वर्षाच्या गुलामीनंतर आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत आहोत. देशाच्या संविधानाची ऐतिहासिक निर्मिती करून भारतीय जनतेला सामाजिक,आर्थिक आणि राजकीय समानतेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशा वेळी ग्रामपंचायतींना न्याय–निवाडयाची सत्ता प्रदान करण्याऐवजी खेडयांतील नागरी हक्कांचे ;ब्पअपस त्पहीजद्ध संरक्षण करण्याचा त्यांच्या हक्कांना सुरक्षितता देण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. गावपंचायतीची पार्श्वभूमी पाहता गावपंचायत अनियंत्रित आहे. त्यामुळे त्यांना अधिकार देणे अयोग्य आहे.

भारतातील सामाजिक विषमता कमी करून लोकशाहीसाठी पोषक परिस्थिती निर्माण करण्याची आवश्यकता असून ग्रामपंचायतीची स्थापना करण्यापेक्षा व्यक्तीच्या हक्कांची सुरक्षितता महत्वाची आहे. या अनुषंगाने झेड.एच.लारी यांनी पुढीलप्रमाणे सूचना केली होती.

''ग्रामपंचायतींना हक्क प्रदान करण्याची पूरेपूर चर्चा झाली आहे. यांपेक्षा नागरिकांच्या हक्कांची सुरक्षितता महत्वाची आहे. भारतामध्ये लोकशाही मूल्ये आणि पंरपरांचा वारसा नाही. त्यामुळे नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होणे आवश्यक आहे.

संविधान सभेत खेडयांसाठी संविधानात्मक हक्कांची तरतूद करावी अशी कॉग्रेसच्या बहुसंख्य सदस्यांची इच्छा होती. दामोदर स्वरूप (संयुक्त–प्रांत–जनरल) यांनी खेडयासंबंधी पुढीप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

''आपण देशाच्या महान संविधानाची निर्मिती करीत आहोत. परंतु संविधानात खेडयाचा कोठेही उल्लेख नाही प्रशानाचा विचार करता खालून वरपर्यंत खेडयाचा संबंध जोडला जातो. परंतु तसा संबंध संविधानात जोडला नाही. त्यामुळे आपले संविधान आंतरिक नसून तो केवळ बाहय पोशाख आहे. खेडयाच्या मसुद्याविषयी संविधानात कोठेही उल्लेख केलेला नाही''

महात्मा गांधीजींच्या कल्पनेनूसार गावाची स्वायत्तता आणि खेडयाचे स्वप्न संविधान–संमितीने रेखाटले नाही. यासंबंधी पंडित ठाकूरदास भार्गव (पंजाब) यांनी सभागृहात पुढीलप्रमाणे सूचना मांडली होती.

''खेडे हा भारताचा आत्मा आहे. भारताच्या आत्म्याचे खरे प्रतिनिधीत्व संविधानात झालेले नाही. खेडयांना स्वायत्तता देण्यात आलेली नाही. लोकांना वास्तवात हवे असलेले चित्र संविधानात नाही. महात्मा गांधीजींच्या विचाराची भावना बहुतेक सदस्यांमध्ये नसल्यामुळे कोटयावधी जनतेचे प्रतिबिंब संविधानात उमटलेले नाही''

राज्ये आणि सम्राज्ये टिकली नाहीत तेथे खेडे महापूरात वृक्ष उन्मळून पडले तरी लव्हाळी तग धरून राहतात. त्याप्रमाणे खेडी टिकून राहिली असा गौरव अनेक सदस्यांनी केला होता.

या अनुषंगाने डॉ. बी.आर.आंबेडकर यांनी खेडयाविषयी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

देशाच्या घडामोडी आणि भवितव्य घडविण्यात खेडयांनी अल्पप्रमाणात सहभाग घेतला असे का घडले असावे ? खेडयांना छोटी गणराज्ये म्हणणा–या सदस्यांना मेटकॉफ या इंग्रज अधिका–यांने खेडयासंबंधी केलेल्या अभिप्रायाची बाबासाहेबांनी सभागृहास आठवण करून दिली ती पुढीलप्रमाणे

'' राज्य उलटली सत्ताधारी बदलले, हिंदू मोंगल पठाण, मराठा, शीख इंग्रज सारेजण क्रमाने सत्ताधारी झाले. परंतु ग्रामीण समाज जसाच्या तसा राहिला परकिय आक्रमण आले की गावकरी आपल्या भितीच्या आत स्वतःला बंदिस्थ करून घेत आणि शत्रुला मुकाटयाने जाऊ देत. जर शत्रुचा स्वतःवरच हल्ला झाला तर ते दुस–या गावाचा आश्रय घेत एखादे गाव बेचिराख झाले व शत्रु निघून गेला की, त्यांचे वंशज घेऊन पुन्हा आपल्या त्याच जुन्या जागी आपले बस्तान वंशज घेऊन पुन्हा आपल्या त्याच जुन्या जागी आपले बस्तान थाटीत. या वृत्तीने ग्रामीण समाज तगलेला आहे. व तो सुख अनुभवित आहे.''

मेटकॉफने दिलेल्या अभिप्रायास अनुसरून डॉ. बी.आर.आंबेडकर यांनी पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केले आहेत.

'' खेडयात राहणा–या लोकसमुदायांनी देशाच्या इतिहासात भाग तो एवढाच घेतला होता. त्यामुळे त्याबद्दल गर्व तो कसा वाटणार ? खेडी केवळ तग धरून राहिली याला काहीच महत्व देता येत नाही. या खेडयांच्या गणराज्यामुळे भारताचा नाश झाला आहे. सभागृहात ज्या सदस्यांनी देशातील प्रांतवादाचा आणि जात–जमातवादाचा धिक्कार केलेला आहे, त्यांनीच खेडयांचा उदो उदो केला याबद्दल मला आश्चर्य वाटते. खेडे म्हणजे जातजमातवादाचे आगर असून आपल्या खेडयापुरताच संकुचित विचार करणा–या अडाण्यांचा तो अडडा आहे. म्हणून संविधानाच्या मसुद्याने खेडे हा घटक त्याज्य मानून 'व्यक्तीचा' सामाजिक घटक म्हणून स्विकार केला याचा मला अधिक आनंद वाटतो.

प्राचीन ग्रामराज्ये कधीही परस्परांच्या मदतीला धावून जात नसत त्याच्यात एकात्मतेची भावना कधीही निर्माण झालेली नाही. आपली. संस्कृती हजारो वर्षे तगली आहे. आपण फक्त जीवन जगलो आहे म्हणून निव्वळ पराभूताचे जीवन जगण्यापेक्षा स्वाभिमानाचे क्षणकाळ लाभणारे जीवन जास्त मोलाचे आहे ''

डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी खेडे म्हणजे जात – जमातवादाचे आगर आणि संकुचित विचार करणा–यांचा अड्डा आहे असे विचार व्यक्त केले. या अनुषंगाने गोकुळभाई दौलतराव भट (मुंबइ–प्रात) यांनी ग्रामपंचायतीसंबंधी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

'' डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी ग्रामपंचायतीला विरोध करून ग्रामपंचायत हा लोकशीचा पाया आहे. ग्रामपंचायतीला बाजूला केले तर वाळूच्या पायावर आधारित असलेली भव्य इमारत कोसळली जाईल''

संविधानसभेत डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी खेडयाबद्दल केलेल्या वर्णनात तथ्यांश आहे. याविषयी दादा धर्माधिकारी यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

''आपल्या देशात आर्थिक व सामाजिक जीवनाचा मुख्य घटक जात होता. जातीधर्म व नागरिक धर्म जवळ–जवळ होते. ग्रामपंचायतींना सहयोगाने काम करावे लागे. कारण ग्रामण्य व बहिष्कार ही दोन अंतिम दंडाधिष्ठाने होती. म्हणून डॉ. बी.आर. आंबेडकर म्हणाले की, जातीय वृत्तीचा नायनाट करून नागरिक वृत्तीचा विकास करायचा असेल तर जातीच्या पायावर आधारित लोकशाहीचा काही उपयोग होणार नाही. त्यासाठी जातीय घटकांऐवजी आर्थिक घटकाचे संयोजन करावे लागेल.''

बेनेगल नरसिंगराव यांनी भारतीय संविधानाच्या मसुद्यात ग्रामपंचायतीचा निर्देश केलेला नव्हता. त्याचप्रमाणे डॉ. बी. आर आंबेडकर

यांच्या सुधारीत मसुद्यातही ग्रामपंचायतीविषयी उल्लेख केलेला नव्हता. तरीसुध्दा महात्मा गांधीजींच्या ग्रामराज्याचे रामराज्यामध्ये रूपांतर करण्यासाठी गांधीवादी सदस्यांनी आपला आग्रह कायम ठेवला होता. सोमवार दि. 22 नोव्हेंबर 1948 रोजी कॉस्टिटयूशन हॉल, नवी दिल्ली येथील सभागृहात संविधानाच्या मसुदा कलम 31 अ मध्ये एम अनंतस्वामी अय्यंगार (मद्रास–जनरल) यांनी 927 क्रमांकाची दुरूस्ती ठराव मांडला होता. परंतु के. संथानम यांनी 31 अ मध्ये योग्य व अर्थपूर्ण कलमाची रचना केल्यामुळे अध्यक्षांची दुरूस्तीस मान्यता दिली.

यावेळी कलम 40 ला दहा वर्षाच्या आत मुलभूत हक्कांचा दर्जा देण्यात यावा अशी संविधानकारांनी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु या घटनेसाठी अठठावन्न वर्षाचा प्रदिर्घ कालवधी लोटला गेला आणि शेवटी दिनांक 24 एप्रिल 1992 च्या 73 व्या संविधानातील प्रकरण चारमधील राज्याच्या मार्गदर्शक तत्वांना कायदेशीर हक्कांचा दर्जा देऊन संविधान दुरूस्तीनुसार संविधानाच्या नवव्या भागात अनुच्छेद 243 मध्ये समावेश करण्यात आला.

प्राचीन काळापासून ग्रामराज्याचा आढावा घेताना असा निष्कर्ष काढता येतो की, भारतातील उतरंडीप्रमाणे असणा–या जातीव्यवस्थेमुळे खेडयाचा अनुभव निराशाजनक आहे. महात्मा गांधीजींनी स्वयंपूर्ण आत्मनिर्भर खेडी, ग्रामराज्यातून रामराज्याची स्विकारलेली संकल्पना ही मुळातच, सामाजिक घटकांवर अवलंबुन नव्हती. त्यामुळे तिचे स्वरूप आध्यात्मिक,कल्पनाविलास आणि लोकशाही तंत्राच्या विरोधी होते. महात्मा गांधीनी स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर खेडयाचे स्वप्न उराशी बाळगले होते. हे जरी खरे असले तरी, खेडे किंवा गाव स्तरावर भौतिक साधन संपत्तीचे विषम वाटप नैसर्गिक साधन–संपत्तीमधील जमिनीचे असमान वाटप, जमीनदारी, यामुळे या गोष्टी म. गांधी हयात असताना झाल्या नाहीत आणि त्यानंतर त्या वास्तवात येणे, अशक्य आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानसभेत खेडे किंवा गाव या घटकाचा 'सामाजिक घटक' म्हणून विचार करण्यात यावा असा आग्रह धरलेला होता. सामाजिक घटकाचा विचार केला असता, तर खेडे गावातील भौतिक साधनसंपत्तीचे समान वाटप झाले असते. उदरनिर्वाहाचे साधन जनतेला प्राप्त झाले असते. आणि त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळाला असता 73 व्या संविधादुरूस्तीने ग्रामसभेला अधिकार प्राप्त झाले तरी आजही विषम आर्थिक स्तररचनेमुळे ग्रामसभेत प्रभावी मतदान होत नाही. खेडयात मागासलेल्या जातीजमातीच्या लोकांच्या अन्याय अत्याचारात घट होण्याऐवजी वाढ होत आहे. दबलेल्या जातीच्या महिला अथवा पुरूष सरपंचाना झेंडावंदन करू दिले जात नाही तसेच ग्रामपंचायतीमध्ये सहकार्य केले जात नाही. त्यामुळे ग्रामसभा ही राजकीय घटकांवर आधारित आहे. ग्रामसभेत सत्तेचे विकेंद्रीकरण आहे. परंतु सामाजिक न्यायाचे विकेंद्रीकरण दिसून येत नाही यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच विचार किती दूरगामी होते याचा प्रत्यय आजही येतो.

### *संदर्भ :*

1.प्राचीन भारतातील ग्रामराज्ये आणि आजच्या ग्रामपंचायता : नवभारत मे 1976
2.भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था : उगम आणि विकास
3.The State in Ancient India : Beni Prasad
4.Constitution Assembly Debates : Laoksabha Secretariat New Delhi, Vol.5,7,11
5. भारतीय गणराज्याची घडण : दादा धर्माधिकारी



*प्रा.डॉ.भगवान माने*
*राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org